॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥


'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

उमाविनगर, जळगाव - ४२५००१, ☎: ०२५७-२२५७२४८,२४९


## कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी प्रस्ताव

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून **`कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार`** सुरु करण्यात आला आहे. या पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येत असून विहीत नमुन्यातील अर्ज, पात्रता, नियमावली, कार्यपध्दती विद्यापीठ संकेतस्थळ **www.nmu.ac.in** वर उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

| अ.क्र. | पुरस्काराचे स्वरूप | पुरस्काराचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | एक व्यक्ती किंवा संस्था यांना रूपये ५१,०००/- सन्मानपत्र व सन्मानचिन्ह | **साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय योगदान** |

महाराष्ट्रातील इच्छुक व्यक्ती / संस्था यांनी पुरस्कारासाठी त्यांचे विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह **दि. ५ मे, २०२५ पर्यंत** विद्यापीठात पोहचतील असे पाठवावेत.

ठिकाण : जळगाव
दिनांक :०२/०४/२०२५

**(डॉ. विनोद प्र. पाटील)**
**कुलसचिव**

----------------------------------------------------------------------------------------

# कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्काराची नियमावली

## प्रस्तावना

केळी आणि कापूस पिकविणाऱ्या काळ्या कसदार जमिनीप्रमाणे कवितेचा सकस पोत जपणारी भूमी म्हणून खानदेशची एक स्वतंत्र ओळख आहे. बाराव्या-तेराव्या शतकापासून संत मुक्ताबाई यांच्या पासून खानदेशातील कवितेच्या परंपरेचा शोध घेता येतो. या कवितेच्या परंपरेतील एक महत्वाचा काव्यबिंदू म्हणून बहिणाबाई चौधरी यांची कविता आपल्या समोर येते. त्यांची कविता केवळ खानदेशापुरती मर्यादित नाही, तर या कवितेने आधुनिक मराठी कवितेच्या आजवरच्या वाटचालीत आपले स्वयंपूर्ण अस्तित्व निर्माण केले आहे. बहिणाबाईंच्या कविता ह्या त्यांच्या जीवनानुभवातून स्फुरलेल्या आहेत. अशिक्षीत, खेडूत, कष्टकरी स्त्री म्हणून आयुष्य घालवलेल्या बहिणाबाईंच्या अलौलिकत्वाची खूण त्यांच्या कवितांतून पटते. या भूमीत राबणाऱ्या बळीराजाच्या जगण्याचे, कृषीसंस्कृतीच्या अंगोपांगाचे मनोहर शब्दचित्र आपल्या कवितेतून त्यांनी रेखाटले. त्या सोबत मानवी जीवनविषयक गहण चिंतनाला साध्या, सोप्या शब्दांतून काव्यरूप दिले. म्हणून त्यांची कविता ‘ जगण्याचे शहाणपण’ देण्याचे बळ बाळगून आहे.

बहिणाबाईंच्या कवितेची जातकुळीच निराळी आहे. पुस्तकी शिक्षण राहोच, पण धुळपाटीचाही जिच्या मनावर संस्कार झालेला नाही अशा खानदेशतील असोदा (जि.जळगाव) येथील एका शेतकऱ्याच्या कुटुंबातील स्त्रीने निर्माण केलेले हे काव्य आहे. त्या सोबतच बहिणाबाईंचा जीवन संघर्ष देखील आहे. कृषीजीवनकेंद्रीत, स्त्री सुलभ भावनेतून समकालीन वास्तवाला अभिव्यक्त करणारी, जीवन विषयक गहन तत्वज्ञान

सहजतेने मांडणारी आणि अस्सल बोलीचे सामर्थ्य जाणणारी ही कविता आहे. निसर्ग, कृषिजन संस्कृती, समंजसपणा यांचा अवकाश त्यांच्या कवितेने व्यापला आहे.

बहिणाबाई चौधरी हे नाव शेती, शेतकरी, संसारी व श्रमसंस्कृतीची पाईक स्त्री, आध्यात्मिक, सश्रध्द आणि जीवन विषक समंजस जाण बाळगणारी संवेदनशील व्यक्ती म्हणून या प्रदेशातील सामान्यजनांशी अगदी सहजतेने जोडले जाते. ह्यामुळेच कवितेपुरता त्यांचा नावाचा विचार करता येत नाही, तर एका संवेदनासंपन्न, विचारी, जीवनसंघर्षाला खंबीरपणे सामोरे जाण्याचे मानसिक धैर्य बाळगणारी, जगण्याच्या शहाणपणा बरोबरच हरवत चाललेल्या मानवीमूल्यांना प्रवाहित करणारी स्त्री म्हणून त्यांच्याकडे बघायला हवे. एका अशिक्षीत कवयित्रीचे नाव या विद्यापीठास देणे ही म्हणूनच एक ऐतिहासिक व अलौकीक घटना ठरते. त्यामुळे कवयित्री बहिणाबाई चौधरी यांचे नाव या विद्यापीठास दिल्याने खानदेशातील कृषिसंस्कृतीचा, खानदेशातील कष्टकरी, ग्रामीण स्त्रीचा आणि लोकपरंपरेने सांभाळलेल्या जीवनविषयक तत्वज्ञानाचा सन्मान आहे.

बहिणाबाईंचे हे तत्त्वज्ञान केंद्रस्थानी ठेवून समर्पित भावनेने अनेक व्यक्ती वा संस्था समाजात कार्यरत आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव व्हावा आणि या कार्याची प्रेरणा इतरांना मिळावी. या उदात्त हेतूने कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार सुरू करावा असा ठराव विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने एकमताने संमत केलेला आहे. त्या अनुषंगाने या पुरस्कारासाठीची मार्गदर्शक नियमावली खालील प्रमाणे तयार करण्यात आली आहे.

### कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार नियमावली

## व्याप्ती

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या व्यक्तिमत्वाचे प्रस्तावनेत उल्लेख केलेले पैलू लक्षात घेऊन व प्रसिध्दीपासून दूर असलेल्या आणि पुर्णत: बहिणाबाई चौधरी यांच्या सारख्या जगण्याच्या तत्वज्ञानाला केंद्रबिंदू मानून काम करणाऱ्या **(१.१) शिक्षण, (१.२) सामाजिक, (१.३) कृषि व (१.४) साहित्य** या चार क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती / संस्थेचा विचार या पुरस्कारासाठी केला जावा.

## १.४ साहित्य क्षेत्र :

**अ) ग्रामीण साहित्य आणि काव्य ही बहिणाबाई चौधरी यांच्याव्यक्तिमत्वाची ओळख असल्यामुळे हा मध्यवर्ती केंद्रबिंदू असणाऱ्या साहित्याचा विचार या पुरस्कारासाठी केला जावा.**

**ब) हा पुरस्कार केवळ मराठी साहित्यासाठी देण्यात यावा.**

**क) साहित्य क्षेत्रातील गेल्या १५ वर्षातील योगदानाचा विचार केला जाईल.**

**ड) साहित्य हे मानवी भाव-भावनांचे, सुख-दु:खाचे आणि मूल्याधिष्ठीत निर्मितीसाठी कटीबध्द असावे.**

**इ) ज्या सामाजिक परिवेशातून साहित्य निर्मिती झाली आहे. त्या परिवेशाची सामाजिक नाळ ही बहिणाबाई चौधरी यांच्या तत्त्वज्ञानाशी निगडीत असावी.**

२) शिक्षण, सामाजिक, कृषि व साहित्य या चार क्षेत्रांपैकी दरवर्षी केवळ एका क्षेत्रातील एका व्यक्ती अथवा संस्थेला हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात यावे.

## पुरस्कारांची संख्या

व्यक्ती अथवा संस्था या पैकी केवळ एकाला हा पुरस्कार दरवर्षी दिला जाईल.

## पुरस्काराचे स्वरूप

१) पुरस्काराचे नाव 'कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार' असे असावे.

२) महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात विधायक आणि भरीव कार्य करणाऱ्या एक व्यक्ती अथवा संस्थेला पुरस्कार म्हणून रोख रक्कम रूपये ५१,०००/- (रूपये एक्कावन्न हजार मात्र), सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

## पुरस्कार पात्रता

१) पुरस्कारासाठीची व्यक्ती/संस्था महाराष्ट्राच्या कोणत्याही भागातील असावी.

२) पुरस्कारासाठी व्यक्तीचे वय ४० वर्षांपेक्षा कमी नसावे (सोबत जन्मतारखेची साक्षांकित सत्यप्रत जोडावी) व १५ वर्षांपेक्षा जास्त काळ त्या क्षेत्रात काम केलेले असावे. पुरस्काराच्या प्रस्तावासोबत केलेल्या कामाची परिणामकारकता सुस्पष्टपणे नमूद करावी.

३) पुरस्कारासाठी नोंदणीकृत संस्थेचे कार्य त्या क्षेत्रात १५ वर्षांहून अधिक असावे. पुरस्काराच्या प्रस्तावासोबत संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत आणि संस्थेचा गेल्या तीन वर्षांचा ऑडिट रिपोर्ट तसेच गत तीन वर्षातील कामाचा तपशील जोडणे अनिवार्य आहे. याशिवाय कामाची परिणामकारकता त्या क्षेत्रात काय झाली आहे याचा तपशील सोबत जोडावा.

४) पुरस्कारासाठी अर्ज करणाऱ्या व्यक्ती / संस्थेने दिलेल्या माहितीबाबत काही न्यायालयीन अथवा खासगी वाद उदभवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी अर्ज करणाऱ्या व्यक्ती / संस्थेची राहील. त्याच्याशी विद्यापीठाचा कोणताही संबंध नसेल.

५) पुरस्कारांसाठी प्राप्त अर्जांसोबत कागदपत्रांच्या सत्यप्रती आणि व्यक्तिगत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र सादर करावे. आवश्यकता भासल्यास (शहनिशा करण्यासाठी) कागदपत्रांच्या मुळ प्रती सादर कराव्या लागतील.

६) विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर विद्यमान सदस्य असलेल्या तसेच विद्यापीठाच्या सेवेत असलेल्या शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्याचा पुरस्कारासाठी विचार केला जाणार नाही.

७) ज्या व्यक्तीस / संस्थेस अर्ज करावयाचा आहे अथवा ज्या व्यक्ती / संस्थेचे नामनिर्देशन करावयाचे आहे त्या व्यक्तीची/संस्थेची जनमानसात निर्मळ व स्वच्छ प्रतिमा असावी, आणि त्यांचे नैतिक अधिष्ठान इतरांना मार्गदर्शक ठरावे. ती व्यक्ती निर्व्यसनी, निस्वार्थी, निष्कलंकित असावी आणि त्यांच्या विरुध्द अधिकाराचा गैरवापर केल्याची तक्रार नसावी. तसेच त्यांच्या विरुध्द कसल्याही प्रकारच्या फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्याची नोंद नसावी.

**कार्यपध्दती**

१) पुरस्कारासाठी योग्य एक नाव सुचविण्यासाठी मा. कुलगुरु तीन सदस्यीय निवड समिती या पुरस्कारासाठी गठीत करतील.

२) निवडसमितीकडून प्राप्त प्रस्तावांची छाननी झाल्यानंतर आवश्यकता वाटल्यास योग्य वाटणाऱ्या व्यक्ती/संस्थेचे काम पाहण्यासाठी निवडसमितीचे तीन सदस्य आणि मा.कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशीत केलेला प्रतिनिधी सदस्य असे चार जण प्रत्यक्ष समक्ष भेट देऊन त्या व्यक्ती/संस्थेचे काम पाहिल व पहाणी अहवाल मा.कुलगुरुंकडे सादर करील. मा.कुलगुरुंचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल.

३) विशेष परिस्थितीत पुरस्कारासाठी प्राप्त प्रस्तावांव्यतिरिक्त इतर योग्य आणि पात्र व्यक्ती/संस्थेच्या नामांकनासाठी मा.कुलगुरू महोदयांच्या पूर्वपरवानगीने नामांकनासाठी शोध समितीने विचार करु शकते.

४) अपूर्ण भरलेले अथवा अपूर्ण माहितीचे अर्ज पुरस्कारासाठी विचारात घेतले जाऊ नये.

५) पुरस्कारापूर्वी काही तक्रार प्राप्त झाल्यास निवड समितीने त्यावर निर्णय घ्यावा. पुरस्कार दिल्यानंतर काही तक्रार आल्यास ती विचारात घेण्यात येणार नाही.

६) निवड समिती पुरस्कारासाठी निश्चित केलेल्या व्यक्ती किंवा संस्था यांचे नाव सिलबंद पाकिटात मा.कुलगुरुंकडे आपल्या अहवालासह सादर करेल.

७) मा.कुलगुरु पुरस्कारासाठी पात्र ठरलेल्या व्यक्ती/संस्थेचे नाव जाहीर करतील.

८) पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आलेल्या अपील/ तक्रारीचा विचार करण्यात येऊ नये.

या पुरस्काराबाबत मा. कुलगुरु महोदयांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. तसेच आवश्यकता भासल्यास वेळोवेळी नियमावलीत बदल करण्याचा अधिकार मा. कुलगुरु महोदयांना राहील. पुरस्कारासंबंधीचे सर्व अधिकार विद्यापीठाने राखून ठेवले आहेत.

महत्वाच्या सूचना :

- पुरस्काराकरीता अर्ज सादर करण्याची **अंतिम मुदत सोमवार, दि.५ मे, २०२५ अशी** आहे.

- पुरस्कारासाठी अर्ज पाठवितांना **बंद लिफाफ्यात** अर्ज पाठवावेत.
- **लिफाफ्यावर “कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारासाठी अर्ज ” असे स्पष्ट नमूद असावे.**
- अर्ज पुढील पत्त्यावर पाठवावेत.

  **कुलसचिव,**

  **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,**

  **पत्र पेटी क्रमांक ८०, जळगाव, जिल्हा जळगाव**

  **पिन कोड क्रमांक ४२५००१**
- सदर पुरस्कार समारंभपूर्वक दिला जाईल. या समारंभाची तारीख विद्यापीठाकडून संबंधितांना कळविण्यात येईल.

दि. २ एप्रिल २०२५

(डॉ. विनोद प्र. पाटील)

कुलसचिव

---

# कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारकरिता अर्ज – व्यक्ती करीता

## पुरस्कार क्षेत्र – साहित्य क्षेत्र – वर्ष २०२५

अर्जदाराचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र

**अर्जदार व्यक्तीने माहिती देतांना खालील मुद्दे विचारात घेऊन त्यासंदर्भात माहिती पुराव्यांच्या कागदपत्रांसह देणे आवश्यक आहे.**

**१.४ साहित्य क्षेत्र :**

अ) ग्रामीण साहित्य आणि काव्य ही बहिणाबाई चौधरी यांच्याव्यक्तिमत्वाची ओळख असल्यामुळे हा मध्यवर्ती केंद्रबिंदू असणाऱ्या साहित्याचा विचार या पुरस्कारासाठी केला जाईल.

ब) हा पुरस्कार केवळ मराठी साहित्यासाठी देण्यात येईल.

क) साहित्य क्षेत्रातील गेल्या १५ वर्षातील योगदानाचा विचार केला जाईल.

ड) साहित्य हे मानवी भाव-भावनांचे, सुख-दु:खाचे आणि मूल्याधिष्ठीत निर्मितीसाठी कटीबध्द असावे.

इ) ज्या सामाजिक परिवेशातून साहित्य निर्मिती झाली आहे. त्या परिवेशाची सामाजिक नाळ ही बहिणाबाई चौधरी यांच्या तत्त्वज्ञानाशी निगडीत असावी.

---

## पुरस्कारासाठी अर्ज

१) व्यक्तीचे नांव व पत्ता :-

२) संपर्क क्रमांक :-

३) ई-मेल :-

४) वेबसाईट (असल्यास) :-

५) लिंग :-

६) पत्नीचे/पतीचे नाव व वय :-

७) जन्म दिनांक :-

(शाळा सोडल्याचा दाखला/आधार कार्ड/जन्म दाखला/दहावी बोर्डाचे प्रमाणपत्र)

८) वय :-

९) जन्म स्थळ :-

१०) राष्ट्रीयत्व :-

११) शैक्षणिक अर्हता :-

१२) आधार कार्ड व बँक खात्याचा तपशील :-

१३) नोकरी / व्यवसाय (पद) :-

१४) अर्जदाराचे चारित्र्य प्रमाणपत्र:-

(पोलीस विभागाचा दाखला)

१५) वाहून घेतलेले क्षेत्र :-

१६) वाहून घेतलेल्या सेवेचा कालावधी :-

१७) कोणत्या गावात / जिल्ह्यात कार्य केले :-

१८) प्राप्त पुरस्कार :-

| अ. क्र. | पारितोषिक / पुरस्काराचे नाव | कोणामार्फत देण्यात येतो (संस्था / विभाग) | वर्ष दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

१९)  वाहून घेतलेल्या क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रमांचा तपशिल :-
(सोबत वृत्तपत्राचे कात्रण व स्वत: लिहीलेले दोन पानांचे कामाची परिणामकारकता सांगणारे टिपण)

२०)  केलेल्या कार्यामुळे समाजावर पडलेला प्रभाव :-

२१)  विशेष कामगिरी :- (पुरस्कार क्षेत्रामध्ये सातत्याने कार्यरत राहून समाजोन्नतीसाठी केलेली विशेष कामगिरी जवळपास दोन पेजेसमध्ये द्यावी त्यासोबत वर्तमानपत्रांची कात्रणे किंवा प्रमाणपत्रासह वेगळे परिशिष्ट जोडावेत)

दिनांक     /     / २०२५

**अर्जकर्त्याचे / नामनिर्देशन**

**करणा-याचे सही व नाव (पत्ता व संपर्क क्रमांक)**

अर्जासोबत जोडलेले परिशिष्ट

| अ. क्र | कागदपत्रांचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार मिळणेसाठी अर्जासोबत द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

**मी ------------------------------------- सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार मिळणेसाठी मी अर्ज करीत आहे.**

१) अर्जात देण्यात आलेली माहिती मी स्वत: लिहीलेली आहे.

२) यापूर्वी मला भारतीय दंडसंहिता १९६० च्या कायद्यानुसार दंड अथवा शिक्षा झालेली नाही. त्यासोबतचा दाखला सोबत जोडलेला आहे

३) कोणत्याही न्यायालयात माझ्या विरूध्द कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

४) कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार मला प्रदान केल्यास तो  स्वीकारेल.

५) मला दिलेल्या पुरस्काराबद्दल काही आक्षेप आल्यास त्याबाबत विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाला मी बांधिल राहील.

स्थळ :

दिनांक :     /     /२०२

अर्जदाराची स्वाक्षरी, नांव व पता

---

# कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कारकरिता अर्ज – संस्था करीता

## पुरस्कार क्षेत्र – साहित्य क्षेत्र – वर्ष २०२५

अर्जदार संस्थेने माहिती देतांना खालील मुद्दे विचारात घेऊन त्यासंदर्भात माहिती पुराव्यांच्या कागदपत्रांसह देणे आवश्यक आहे.

**१.४ साहित्य क्षेत्र :**

अ) ग्रामीण साहित्य आणि काव्य ही बहिणाबाई चौधरी यांच्याव्यक्तिमत्वाची ओळख असल्यामुळे हा मध्यवर्ती केंद्रबिंदू असणाऱ्या साहित्याचा विचार या पुरस्कारासाठी केला जाईल.

ब) हा पुरस्कार केवळ मराठी साहित्यासाठी असेल.

क) साहित्य क्षेत्रातील गेल्या १५ वर्षातील योगदानाचा विचार केला जाईल.

ड) साहित्य हे मानवी भाव-भावनांचे, सुख-दु:खाचे आणि मूल्याधिष्ठीत निर्मितीसाठी कटीबध्द असावे.

इ) ज्या सामाजिक परिवेशातून साहित्य निर्मिती झाली आहे. त्या परिवेशाची सामाजिक नाळ ही बहिणाबाई चौधरी यांच्या तत्त्वज्ञानाशी निगडीत असावी.

---

## पुरस्कारासाठी अर्ज

१) संस्थेचे पूर्ण नांव :-

२) संस्थेचा पूर्ण पत्ता :-

३) संस्थेची नोंदणी :-

१) संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

२) मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५०

वरील प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडावी

४) संबधित संस्था सुरू झाल्याचा दिनांक :-

५) संस्थेचा ई-मेल व वेबसाईट :-

६) संस्थेचे बँकेचे खाते क्रमांक :-

७) संस्थेस सरकारी वा बिगर सरकारी अनुदान मिळत असल्यास तपशील :-

८) संबधित संस्थेचे कार्यक्षेत्र :-

९) संस्थेच्या कार्यकारी मंडळातील अध्यक्ष / सचिव यांचे

नाव, पता व भ्रमणध्वनी क्रमांक – इत्यादी सविस्तर माहिती

१०) सदर संस्थेविरूध्द अथवा संस्थेच्या पदाधिका-यांवर फौजदारी गुन्हा दाखल झाला नसल्याबाबतचा जिल्हा पोलिस विभागाचा दाखला

११) संस्थेचा लेखापरिक्षणाचा तीन वर्षाचा अहवाल

१२) संस्थेच्या घटनेची प्रमाणित प्रत व मागील ३ वर्षाचा कामाचा अहवाल

१३) संस्थेचे वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांचा तपशिल (प्रती सोबत जोडाव्यात)

१४) संस्था कशासाठी कार्य करते ते क्षेत्र, उपक्रमांचा सविस्तर तपशील (प्रती सोबत जोडाव्यात)

१५) संस्थेने उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल त्यांना शासनामार्फत किंवा विभिन्न संस्थेमार्फत सत्कार अथवा पारितोषिक / पुरस्कार मिळाले असल्यास त्याचा तपशिल.

| अ. क्र | पारितोषिक / पुरस्काराचे नाव | कोणामार्फत देण्यात येतो (संस्था / विभाग) | वर्ष दिनांक |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

(सोबत वृत्तपत्रांचे कात्रण व स्वत: लिहीलेले दोन पानांचे कामाची परिणामकारकता सांगणारे टिपण)

१६) केलेल्या कार्यामुळे समाजावर पडलेला प्रभाव :-

१७) याव्यतिरिक्त माहिती द्यावयाची असल्यास स्वतंत्रपणे द्यावी.

१८) संस्थेचे रंगीत छायाचित्र

दिनांक (संस्थेचे अध्यक्ष / सचिव यांचे स्वाक्षरी व नाव)

संस्थेचा शिक्का

अर्जासोबत जोडलेले परिशिष्ट

| अ. क्र | कागदपत्रांचा तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

# कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार मिळणेसाठी अर्जासोबत द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

**आम्ही ------------------------------------ अध्यक्ष/सचिव ----------------------------- -या संस्थेतर्फे सत्य प्रतिज्ञेवर निवेदन करतो की, कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार संस्थेस मिळणेसाठी  अर्ज करीत आहे.**

१) अर्जात देण्यात आलेली माहिती आम्ही स्वत: लिहीलेली आहे.

२) यापूर्वी मला व आमच्या संस्थेतील पदाधिकाऱ्यांना भारतीय दंडसंहिता १९६० च्या कायद्यानुसार दंड अथवा शिक्षा झालेली नाही. त्यासोबतचा आमचे पोलिस निरिक्षक यांनी दिलेले दाखले सोबत जोडलेले आहेत.

३) कोणत्याही न्यायालयात माझ्या व संस्थेतील पदाधिकाऱ्यां विरूध्द किंवा संस्थेबाबत कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही.

४) कवयित्री बहिणाबाई चौधरी पुरस्कार  प्रदान केल्यास तो संस्था स्वीकारेल.

५) संस्थेला दिलेल्या पुरस्काराबद्दल काही आक्षेप आल्यास त्याबाबत विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयाला आम्हा सर्व पदाधिकाऱ्यांना व संस्थेला बांधिल राहील.

स्थळ :

दिनांक :      /      /२०२

अर्जदार संस्था अध्यक्ष/सचिव यांची स्वाक्षरी,
नांव, पता व संस्थेचा शिक्का